नियमित दिवाणी दावा नंबर २३/२०१३

**<u>नि. ४८ वरील आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० अन्वये दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :—

प्रस्तुतचा दावा वादी क्र. १ व २ यांनी प्रतिवादीकडून महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायदयान्वये दावामिळकतीचा कबजा मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. अर्जदार व वादी एकाच जमिन मिळकतीत राहत असून त्यांची घरे एकमेकांना लागून आहेत. दावा मिळकतीचे शेडगे कुटूंबियांचे दरम्यान अदयाप वाटप झालेले नाही. दावामिळकतीच्या जागेचे शेडगे कुटूंबियांचे दरम्यान समान हिस्से करण्याचे ठरले असून अर्जदार यांना पहिला हिस्सा दयायचे ठरले आहे. अर्जदाराला व त्याच्या मुलांना कामधंदा सुरु करण्याकरीता जागेची निकड असल्याबाबत वादीने दाव्यात नमुद केले आहे. वादी क्र. १ व २ वयोवृध्द असून कायम आजारी असतात. त्या नेहमी कोर्टात उपस्थित राहू शकत नाही. अशावेळी दावा वादींच्याविरुध्द निकाली होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे प्रस्तुत दाव्यात वादीपणात सामील करण्यात यावे अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी निशाण ५२ येथे म्हणणे दाखल केले ते असे की, प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने वेळ काढूपणा करण्यासाठी केला आहे. अर्जदार यांना कोणता हिस्सा देण्याचे ठरले याबाबत वादीने तसेच अर्जदाराने मौन बाळगलेले आहे. प्रस्तुतचा दावा ताब्याकरीता असून तो मंजूर झालाच तर वादी अर्जदाराला कोणतीही मिळकत देवू शकतात . त्यामुळे अर्जदार याकामी आवश्यक पक्षकार नाही. वादी क्र १ व २ यांच्या आजारपणाबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. वादीविरुध्द झालेला पुरावा बंद आदेश अन्य मार्गाने रदद होण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे तरी तो नामंजुर व्हावा अशी प्रतिवादी क्र १ ते ३ यांनी विनंती केली.

४. दोन्ही पक्षांच्या कथनांवरुन न्यायालयासमोर खालील वाद मुददे उपस्थित झाले त्या मुददयांची कारणमिमांसेसहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे —

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत काय ? | होय |
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

५. अर्जदारातर्फे वकील श्री.ए.एस.कदम यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे मुदत देवून देखील युक्तिवाद करण्यात आलेला नाही.

६. दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ मधील आदेश १ नियम १० अन्वये दाव्यातील ख—या वादविषयाचा निर्णय करण्यासाठी कोणत्याही टप्प्याला आवश्यक वाटणा—या व्यक्तीला जादा वादी म्हणून सामील करुन घेण्याबाबत न्यायालय आदेश करु शकते.

७. दावामिळकत वादी व अर्जदार यांची शेडगे कुटूंबियांची एकत्र मिळकत असून वादीने प्रस्तुतचा दावा दावामिळकतीचा कबजा मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार दावा ताब्याकरीता असल्याने अर्जदार आवश्यक पक्षकार नाहीत. परंतु दाव्याचे अवलोकन करता दावामिळकतीचे अदयाप वाटप झालेले नाही. तसेच दाव्यात अर्जदाराला जागेची गरज असल्याचे वादीने नमुद केले आहे. यावरुन अर्जदाराचा दावामिळकतीत हिस्सा व अधिकार असल्याचे दिसून येते.

८. वादी क्र. १ व २ यांच्या आजारपणाबाबत कोणताही पुरावा नसला तरी प्रस्तुत अर्जदाराला त्याचा दावामिळकतीतील हिस्सा संरक्षित करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे तो दाव्यातील आवश्यक पक्षकार आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार पुरावा बंद झाल्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराने देखील अर्ज दाखल करण्यास विलंब झाल्याबाबत कोणतेही स्पष्टीकरण नमुद केलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खर्चासहीत मंजुर करण्यात येतो.

९. वरील सर्व बाबींचा विचार करता मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मी खालील आदेश पारित करीत आहे.

# <u>आदेश</u>

१. अर्जदार यांचा नि. ४८ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदाराने प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना रक्कम रु. ३००/— खर्च दयावा.

दिनांक :—३१/१०/१८

(पी.आर.सबनीस)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
देवरूख

-:CERTIFICATE:-

Judgment/order in (Order below Exh. 48 in R.C.S No. 23/2013))

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | A.A. Shivalkar |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 31/10/2018 |
| Judgment signed by PO. on | :- | 31/10/2018 |
| Judgment uploaded on | :- | 31/10/2018 |